(५)

सहाय्यक परिचारीका प्रसाविका या संवर्गातील कर्मचाऱ्यांना "महिला आरोग्य अभ्यागत" या पदावर पदोन्नतीकरिता सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक पदोन्नती २००२/प्रक्र २२५/सेवा-५
मंत्रालय,मुंबई-४०००३२
दिनांक २७ फेब्रुवारी २००३

वाचा : १)शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही १०९५/प्रक्र १/९५/बारा दिनांक ८.६.१९९५

२)शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११९९/प्रक्र.२/९९/सेवा-३ दिनांक २०.७.२००१

३)सहसंचालक,आरोग्य सेवा(आरोग्य),पुणे यांचे पत्र क्र. संसंआसे/५१/जिकसं-सप/ ४२०६१-६२/२००२ दि.२.१२.२००२.

प्रस्तावना :-

"गट क व गट ड" मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्याने कुंठीतता घालविण्यासाठी कालबध्द पदोन्नती योजना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ८ जून १९९५ अन्वये अंमलात आली आहे. या योजनेंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय असून त्याकरिता पदोन्नतीसाठी विहित केलेली अर्हता/विभागीय परिक्षा,ज्येष्ठता पात्रता या सर्व बाबींची पूर्तता करणे आवश्यक ठरविले आहे. ही योजना बंद करुन नविन सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दिनांक १ ऑगस्ट २००१ पासून शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक २० जुलै २००१ अन्वये अंमलात आली आहे. या योजनेंतर्गतही पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय असून त्यासाठी विहित केलेल्या सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत "महिला आरोग्य अभ्यागता" या पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार ६ महिन्याच्या पदोन्नतीच्या प्रशिक्षण घर्गान्तर विहित परिक्षा उत्तीर्ण केलेल्या सहाय्यक परिचारीका प्रसाविका या पदावरील कर्मचाऱ्यांमधून ज्येष्ठता व पात्रता या निकषानुसार पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येते. तथापि, १२ वर्ष नियमित सेवा पूर्ण झालेले परंतु प्रशिक्षणाची संधी उपलब्ध न झालेल्या सहाय्यक परिचारीका प्रसाविका यांना प्रशिक्षण दिलेले नसल्याने त्यांनी त्यानंतर विहित परिक्षा उत्तीर्ण केली नाही त्यामुळे त्यांना कालबध्द पदोन्नती/सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही. या कर्मचाऱ्यांना केवळ प्रशिक्षण घेतले नाही या कारणास्तव या योजनेचा लाभ त्यांचा काहीही दोष नसतांना नाकारणे योग्य होणार नाही. कारण राज्यात सहाय्यक परिचारीका प्रसाविकांना प्रशिक्षण देण्याची क्षमता अपुरी असल्याने तसेच प्रत्यक्षात या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या बरीच मोठी असल्याने सर्वच कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे शक्य होत नाही. या कर्मचाऱ्यांना विहित कालावधीत प्रशिक्षण पूर्ण करण्याची अट नाही. तसेच पदोन्नतीची पदे कमी असल्याने प्रशिक्षण घेतलेल्या कर्मचाऱ्यांना अद्यापि पदोन्नती देण्यात आलेली नाही. या सर्व बाबी विचारात घेऊन सहाय्यक परिचारीका प्रसाविका या पदावरील कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

5

## शासन निर्णय :

वर नमूद करण्यात आलेली पार्श्वभूमी लक्षात घेऊन राज्यातील सहाय्यक परिचारीका प्रसाविका(वेतनश्रेणी रु.४०००-१००-६०००) या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार " महिला आरोग्य अभ्यांगता"(वेतनश्रेणी रु.४५००-१२५-७०००) या पदोन्नतीवरील पदाची वेतनश्रेणी उपरोक्त अ.क्र.१ येथील आदेशानुसार त्या पदावरील पदोन्नतीकरिता प्रशिक्षण पूर्ण करणे व विहित परिक्षा उत्तीर्ण होण्याची अट शिथिल करुन खालील अटींच्या आधीन राहून मंजूर करण्यास एक विशेष बाब म्हणून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ १२ वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या परंतु प्रशिक्षणाची संधी उपलब्ध न झालेल्या सहाय्यक परिचारीका प्रसाविकांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ त्यांची १२ वर्षांची नियमित सेवा ज्या दिनांकास पूर्ण होईल त्या दिनांकापासून अनुज्ञेय राहिल. तथापि भविष्यात सेवा ज्येष्ठतेनुसार विहित प्रशिक्षण देण्यात आल्यावर ते पूर्ण करुन विहित परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील अन्यथा वरिष्ठ वेतनश्रेणीचे लाभ काढून घेण्यात येईल.

ब "महिला आरोग्य अभ्यांगता" या पदावरील पदोन्नतीकरिता प्रशिक्षण पूर्ण करणे व विहित परिक्षा उत्तीर्ण होण्याची अट शिथिल करण्यात आली असली तरी त्या व्यतिरिक्त शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन११०९/प्रक्र२/९९/सेवा-३ दिनांक २० जुलै २००१ अन्वये विहित केलेल्या इतर सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे.

क पदोन्नतीसाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण नाकारलेल्या तसेच प्रशिक्षणानंतरची परिक्षा उत्तीर्ण न झालेल्या सहाय्यक परिचारीका प्रसाविका यांना या योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय राहणार नाही.

२. सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजुर करण्यात आलेल्या या सहाय्यक परिचारीका प्रसाविकांना विहित कालावधीत व सेवा ज्येष्ठतेनुसार प्रशिक्षणासाठी पाठविण्याबाबत महासंचालक,आरोग्य सेवा,मुंबई/सहसंचालक,आरोग्य सेवा(आरोग्य), पुणे यांनी कालबध्द कार्यक्रम तयार करुन त्यांना प्रशिक्षणासाठी पाठविण्याची व्यवस्था करावी.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १०८/सेवा-३ दि.२०.२.२००३ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भि.रा.उके)
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव

प्रति
महासंचालक,आरोग्य सेवा,मुंबई